(९)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टावर्स,
नरिमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एस.टी.डी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

क्र.मजीप्रा/सस/ दिनांक : ९ जानेवारी, २००१

**विषय** : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८९ व्या सभेचे इतिवृत्त

आज दि.९ जानेवारी, २००१ रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ८९ वी बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त आपल्या अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

कृपया, सदर इतिवृत्तास मान्यता देण्यात यावी, ही विनंती.

सोबत : प्रारुप इतिवृत्त.

(सुरेश साळवी)
सदस्य सचिव

**मा.मंत्री, ग्राम विकास, पा.पु.व स्व.**
**तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष**

MJP
Mumbai-21.
Date 11/1/01
Received

मा स/स.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८९ व्या बैठकीचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ८९ वी सभा मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष मा. ना.श्री. आर.आर. पाटील, यांच्या अध्यक्षतेखाली दि.९ जानेवारी,२००१ रोजी संपन्न झाली. या बैठकीस प्राधिकरणाचे खालील सदस्य व विशेष निमंत्रित उपस्थित होते.

१. श्री.आर.आर.पाटील,मा.मंत्री,ग्रामविकास,पा.पु.व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष.
२. श्रीमती सुलेखाताई कुंभारे,मा.राज्यमंत्री,पा.पु.व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे पदसिध्द उपाध्यक्ष
३. श्री.एस.प्रभाकरन, प्रधान सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय,मुंबई
४. श्री.रामानंद तिवारी,प्रधान सचिव(२),नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
५. श्री.सुरेश साळवी,सदस्य सचिव,म.जी.प्रा.,मुंबई

या व्यतिरिक्त खालील निमंत्रित उपस्थित होते.

१. श्री.राजेंद्र सगणे, सदस्य सचिव(तांत्रिक),म.जी.प्रा.,मुंबई
२. श्री.स.रा.बागल,वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी,म.जी.प्रा.,नवी मुंबई
३. श्री.शेखर गायकवाड,मुख्य प्रशासकीय अधिकारी,म.जी.प्रा.,नवी मुंबई
४. श्री.मिलिंद केळकर,अ.अ.(समन्वय),म.जी.प्रा.,मुंबई
५. श्री.जी.सी.शर्मा,अ.अ.,म.नि.सं.व सं.कक्ष,म.जी.प्रा.,नवी मुंबई

मा.मंत्री,ग्राम विकास,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरुवात झाली.

**कार्यक्रम बाब क्र.१:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८८ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.**

सभेच्या सुरुवातीस दि.१० ऑक्टोबर, २००० रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या ८८ व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.

या सभेमध्ये वरील कार्यक्रम बाब क्र.१ वगळता एकूण १४ कार्यक्रम बाबी मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात आल्या होत्या. तथापि,वेळेअभावी त्यापैकी फक्त कार्यक्रम बाब क्र.८ व ११ या दोनच कार्यक्रम बाबींवर चर्चा करण्यात आली व उर्वरित कार्यक्रम बाबी प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये सादर कराव्यात असा निर्णय घेण्यात आला.

**कार्यक्रम बाब क्र.८:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन १९९९-२००० वर्षाचे वार्षिक लेखे अनुसमर्थनार्थ**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा १९९९-२००० चा वार्षिक लेखा अहवाल महालेखापालांना त्वरेने सादर करणे आवश्यक असल्याने तसेच प्राधिकरणाची ८९ वी सभा केव्हा होईल हे निश्चित

...२...

नसल्याने १९९९-२००० चे वार्षिक लेखे स्वीकृत होण्यासाठीची कार्यक्रम बाब सर्व सन्माननीय सदस्यांमध्ये फिरवून मंजूर करुन घेण्यात आली आहे, हे निदर्शनास आणून देवून या बैठकीमध्ये ही कार्यक्रम बाब अनुसमर्थनार्थ सादर करण्यात आली आहे असे सांगण्यात आले. या कार्यवाहीस सर्वांनी मान्यता दिली.

**<u>कार्यक्रम बाब क्र.११:-</u>** **<u>दि.१/१/१९९६ पासून सुधारित वेतनश्रेणी मंजुर करण्याबाबत पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेली सुधारित वेतनश्रेणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबत.</u>**

महाराष्ट्र शासन, वित्त विभागाची अधिसूचना क्र.वेपूर-१२९८/प्र.क्र.९८/सेवा-१०,दि.१० डिसेंबर,१९९८ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा(सुधारित वेतन) नियम १९९८ राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आले आहेत. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना दि.१/१/१९९६ पासून लागू करण्यांत आलेली वेतनश्रेणी प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना शासनाचे आदेश क्र.इएसटी-१०९८/प्र.क्र.३२४/पापु २३, दि.१९ मे,१९९९ अन्वये लागू करण्यात आली आहे.

तथापि, दि.३/१०/२००० चे अ.शा.पत्र क्र.इएसटी २०००/प्र.क्र.७१/पापु २३ अन्वये पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने असे सूचित केले होते की,'' दि.१६ फेब्रुवारी२००० रोजी मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाप्रमाणे ज्या उपक्रमांना या अगोदर पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशी शासन मान्यतेने किंवा शासन मान्यतेशिवाय लागू केलेल्या आहेत, त्यास संबंधित प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अखत्यारितील उपक्रमांचे आर्थिक लेखे तपासून राज्यातील जे उपक्रम नफ्यात आहेत व पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे ज्या कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू केल्याने येणारा आर्थिक भार ते स्वबळावर पेलू शकतील व पुढील १० वर्षे तोटयात जाणार नाहीत, अशा उपक्रमांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यास संबंधित उपक्रमांना संचालक मंडळाने मान्य केलेल्या प्रस्तावावर प्रशासकीय विभागाने वित्त विभागाच्या सहमतीने निर्णय घ्यावयाचा आहे. त्यानुसार या निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे आर्थिक लेखे तपासून त्यास संचालक मंडळाची मान्यता घ्यावी.

या अनुषंगाने ही कार्यक्रम बाब प्रस्तावित करण्यात आलेली होती. या कार्यक्रम बाबीवर साधकबाधक चर्चा करण्यात आली व प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू केल्यामुळे येणारा आर्थिक भार प्राधिकरण स्वबळावर पेलू शकेल व प्राधिकरणास तोटा होणार नाही हे निदर्शनास आले. त्यामुळे ही कार्यक्रम बाब मान्य करण्यात येवून खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**<u>ठराव :-</u>**

दि.१९/५/२००० चा शासन निर्णय क्र.इएसटी १०९८/प्र.क्र.२३४/पापु २३ अन्वये प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेली सुधारित वेतनश्रेणी कायम करण्यास शासनास विनंती करण्यात यावी. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी सदस्य सचिव(प्रशासन) यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

(५)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टावर्स,
नरिमन पॉईट,
मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एस.टी.डी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

क्र.मजीप्रा/सस/ ७८

दिनांक : १३ ऑक्टोबर,२०००

**विषय** : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८८ व्या सभेचे इतिवृत्त

दि.१० ऑक्टोबर,२००० रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ८८ वी बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त आपल्या अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

कृपया, सदर इतिवृत्तास मान्यता देण्यात यावी, ही विनंती.

(सुरेश साळवी)
सदस्य सचिव

मा.मंत्री,ग्राम विकास,पा.पु.व स्व.
तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष

22/10

Pl take further n.a.

MJP
Mumbai-21.
Date 24/10
Received

उपाअंग
स.स.(प्र.)

23/X

9608
9E190

30/10
CAO

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८८ व्या बैठकीचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ८८ वी सभा मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष मा.ना.श्री.आर.आर.पाटील,यांच्या अध्यक्षतेखाली दि.१० ऑक्टोबर,२००० रोजी संपन्न झाली. या बैठकीस प्राधिकरणाचे खालील सदस्य व विशेष निमंत्रित उपस्थित होते.

१. श्री.आर.आर.पाटील,मा.मंत्री,ग्रामविकास,पा.पु.व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष.
२. श्रीमती सुलेखाताई कुंभारे,मा.राज्यमंत्री,पा.पु.व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे पदसिध्द उपाध्यक्ष
३. श्री.सुनिल तटकरे, मा.राज्यमंत्री,नगर विकास तथा प्राधिकरणाचे पदसिध्द उपाध्यक्ष
४. श्री.एस.प्रभाकरन, प्रधान सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय,मुंबई
५. श्री.सुरेश साळवी,सदस्य सचिव,म.जी.प्रा.,मुंबई

या व्यतिरिक्त खालील निमंत्रित उपस्थित होते.

१. श्री.राजेंद्र सगणे, सदस्य सचिव(तांत्रिक),म.जी.प्रा.,मुंबई
२. श्री.शे.दौ.अरमाळ,विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता,म.जी.प्रा.,नवी मुंबई
३. श्री.स.रा.बागल,वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी,म.जी.प्रा.,नवी मुंबई
४. श्री.र.शे.कामत,मुख्य प्रशासकीय अधिकारी,म.जी.प्रा.,नवी मुंबई
५. श्री.मिलिंद केळकर,अ.अ.(समन्वय),म.जी.प्रा.,मुंबई
६. श्री.जी.सी.शर्मा,अ.अ.,म.नि.सं.व सं.कक्ष,म.जी.प्रा.,नवी मुंबई
७. श्री.ल.पा.कालीबाग, उप सचिव, ग्राम विकास विभाग,मंत्रालय,मुंबई

मा.मंत्री,ग्राम विकास,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरुवात झाली.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे सचिव,श्री.व्ही.पी.राजा यांची बदली झाली असून त्यांचा कार्यभार प्रधान सचिव श्री.प्रभाकरन,यांनी दि.९ ऑक्टोबर,२००० रोजी स्वीकारलेला आहे. या पार्श्वभूमीवर बदली झालेल्या सचिवांना निरोप व नव्याने कार्यभार स्वीकारलेल्या प्रधान सचिवांचे स्वागत अशा छोटया समारंभाचे आयोजन सभेच्या सुरुवातीस झाले. तसेच श्री.व्ही.पी.राजा यांचे कामाची प्रशंसा करुन, त्यांना पुढील काळासाठी शुभेच्छा व्यक्त करुन सभेचे पुढील कामकाज सुरु करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.१:- म.जी.प्राधिकरणाच्या ८७ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.**

मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांनी प्राधिकरणाच्या ८७ सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता दिल्यानुसार ८ ७ व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.२:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८७ व्या सभेच्या कार्यक्रम बाबींवर करण्यात आलेली कृती.**

या कार्यक्रम बाबीवर सर्वसाधारण चर्चा करीत असताना मोरबे धरणाच्या उर्वरित बांधकामासाठी लागणाऱ्या रु.५० कोटी निधीबाबतची कल्पना सदस्य सचिव यांनी दिली. यावर मा.अध्यक्ष महोदयांनी असे सूचित केले की, या धरणाव्दारे उपलब्ध होणारे काही पाणी सिंचनासाठी पाटबंधारे विभागास उपलब्ध करुन दिल्यास त्याप्रमाणात या कामासाठी काही निधी पाटबंधारे विभागाने उपलब्ध करुन दिल्यास उर्वरित निधीबाबत प्राधिकरणाने व्यवस्था करुन, हे काम पूर्ण करणेबाबत पडताळणी करण्यात यावी. या अनुषंगाने पाटबंधारे विभागाशी चर्चा करुन सविस्तर प्रस्ताव तयार करण्यात यावा व या प्रश्नी मार्ग काढण्यासाठी मुख्य सचिवांकडे एका बैठकीचे आयोजन करण्यात यावे असे ठरले.

तसेच या धरणाव्दारे उपलब्ध होणारे पाणी गुरुत्व पध्दतीने नवी मुंबई महानगरपालिकेस उपलब्ध करुन दिल्यास अस्तित्वातील योजनेच्या देखभाल दुरुस्तीमध्ये जी बचत होईल तिचा फायदा करुन घेता येईल का या शक्यतेचाही विचार व्हावा असे मा.मंत्री महोदयांनी सूचित केले.

प्राधिकरणाच्या ८७ व्या बैठकीमध्ये प्राधिकरणाने शुध्द पाण्याच्या विक्रीसाठी प्रकल्प उभा करणे व या अनुषंगाने प्रायोगिक तत्वावर सार्वजनिक क्षेत्रात उतरणे या विषयावर अशी नोंद घेण्यात आली की, असा प्रकल्प हाती घेणे याबाबतची शक्याशक्यता तपासून पहाण्यात येत आहे. यासाठी साधारणत: रु.१ कोटी ते रु.४ कोटीची गुंतवणूक अपेक्षित असून सध्या प्राधिकरणाकडे जो कर्मचारी वर्ग उपलब्ध आहे त्यांचा उपयोग करुन घेवूनच हा प्रकल्प राबविण्याचे प्रस्तावित आहे. सध्या हा प्रस्ताव अगदीच प्राथमिक टप्प्यात असून सविस्तर प्रस्ताव सत्वरच शासनास सादर करण्यात येत आहे.

सोलापूर महानगरपालिकेकडे असणाऱ्या थकबाकीच्या वसुलीबाबत चर्चा करताना सदस्य सचिवांनी स्पष्ट केले की, या प्रकरणी सत्वर मार्ग काढणे आवश्यक आहे. यावर मा.मंत्री महोदयांनी सूचना दिल्या की, श्री.अरमाळ, विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता,यांनी या योजनेस त्वरित भेट देवून कामे पूर्ण करण्याबाबत का दिरंगाई झालेली आहे त्याचा आढावा घेवून त्वरित कार्यवाही करावी व आवश्यक वाटल्यास दोषी अधिकाऱ्यावर योग्य ती कारवाई करावी.

प्रसंगानुरुप या कार्यक्रम बाबीवर चर्चा करताना मा.राज्यमंत्री,नगर विकास,यांनी अशी विचारणा केली की, कोकणातील ज्या योजनांची चौकशी करण्याचे त्यांनी आदेश दिले होते त्याबाबत काय झाले. यावर सदस्य सचिवांनी स्पष्ट केले की, आय.आय.टी. व व्ही.जे.टी.आय. या संस्थांकडून या योजनांची चौकशी करण्याची कार्यवाही सुरु आहे. यावर राज्यमंत्री महोदयांनी अशा सूचना केल्या की, या योजनांच्या चौकशीचा पाठपुरावा करुन, सत्वर अहवाल सादर करावा.

**कार्यक्रम बाब क्र.३: - महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची आर्थिक स्थिती व कामाचा आढावा.**

सन २०००-२००१ या वर्षात प्राधिकरणास प्राप्त होणारा एकूण निधी , आत्तापर्यंत प्राप्त झालेला निधी, कामांच्या व्याप्तीच्या प्रमाणात उपलब्ध निधीचे नियोजन याबाबतची सविस्तर आकडेवारी या कार्यक्रमबाबीव्दारे देण्यात आल्याचे सदस्य सचिव यांनी स्पष्ट केले त्याची नोंद घेण्यात आली. तसेच केंद्र शासनाकडून मिळावयाच्या एकूण रु.१३५.१४ कोटी अनुदानापैकी काहीही अनुदान अद्याप मिळालेले नाही . ही बाब विचारात घेवून त्वरित या प्रकरणी मार्ग काढण्यासाठी पाठपुरावा

करावा.सदर अनुदानाच्या वितरणाबाबत केंद्र शासनाकडून काही आक्षेप घेण्यात आले असतील तर त्याची त्वरित पूर्तता करण्यात यावी. याशिवाय खालीलप्रमाणे निधी उपलब्धतेसाठी प्रयत्न करावेत असे सूचित करण्यात आले.

१) हुडको या संस्थेकडून रु.२०० कोटीचे कर्ज प्राप्त करण्यासाठी शासकीय हमी सत्वर प्राप्त करुन घ्यावी. कारण, त्या रकमेतून घ्यावयाच्या योजनांचे प्रस्ताव हुडकोने मान्य केले आहेत.

२) अतिरिक्त कर्जरोखे उभारणीसाठी उच्चाधिकार समितीसमोर केलेला प्रस्ताव मंजूर करुन घ्यावा.

आजतागायत साधारणत: रु.२०० कोटी किंमतीची कंत्राटदारांनी केलेल्या कामांची देयके प्राधिकरणाकडे प्रलंबित असून यासाठी दिवाळीपूर्वी काही निधी वर्ग करण्याबाबत प्रयत्न करण्यात येतील असे सदस्य सचिवांनी सांगितले. तसेच पाणी पुरवठा योजनांसाठी घेण्यात आलेल्या कर्जाची परतफेड, नोव्हेंबर,२००० पर्यंत प्राधिकरणास आस्थापना व अवजारे तसेच वेतनापोटी लागणारा निधी इत्यादीचे देखील उत्तरदायित्व प्राधिकरणास असल्याने उपलब्ध निधी सर्व शक्यतांचा आढावा घेवूनच वितरित करण्यात येईल.

यावर मा.मंत्री महोदयांनी अशा सूचना केल्या की, अनुदानापोटी शासनाकडून प्राप्त व्हावयाचा निधी, पाणी पुरवठा योजनांसाठी कर्जरोख्याव्दारे उभारावयाचा निधी यासाठी विशेषत्वाने प्रयत्न करुन जास्तीत-जास्त निधी प्राप्त करुन घेण्याबाबत कसून प्रयत्न करावेत व उपलब्ध होणारा निधी प्रगतीपथावरील पाणी पुरवठा योजनांसाठी प्राधान्याने वापरण्याचा विचार व्हावा.

**<u>कार्यक्रम बाब क्र.४:-</u>** **<u>पाणी पुरवठा योजनांसाठी वेळेवर पुरेसा निधी मिळत नसल्यामुळे सुरु असलेल्या योजनांचा अंमलबजावणीसाठी प्राधान्यक्रमाने विचार करणे व तत्संबंधी उद्‌भवणाऱ्या निविदा संदर्भातील समास्या.</u>**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून पाणी पुरवठा योजनांबाबतचा महत्वाकांक्षी कार्यक्रम राबविण्यासाठी घेतलेला होता. त्या अनुषंगाने प्राधिकरणावर असलेले आर्थिक उत्तरदायित्व व कामांचे नियोजन या अनुषंगाने ही कार्यक्रम बाब प्रस्तावित करण्यात आल्याचे सदस्य सचिवांनी स्पष्ट केले. प्राधिकरणाकडे सध्या जी कामे सुरु आहेत त्या प्रमाणात निधी उपलब्ध होणार नाही हे अतिशय स्पष्ट आहे. त्यामुळे उपलब्ध होणारा निधी वापरुन जास्तीत-जास्त पाणी पुरवठा योजना कशा कार्यान्वित करण्यात येतील याबाबतचा सविस्तर आढावा प्रशासनाकडून घेण्यात आला असून त्या अनुषंगाने कांही वस्तुनिष्ठ तत्वांवर ज्या योजनांना प्राधान्य दयावयाचे त्याचा क्रमही ठरविण्यात आला आहे. या अनुषंगाने योजनांची नागरी व ग्रामीण अशी वर्गवारीही करण्यात आली आहे याची प्राधिकरणाने नोंद घेतली. याबाबत चर्चा झाली. कार्यक्रम बाबीत दिलेल्या सविस्तर माहितीचा विचार करण्यात आला.

**१. ग्रामीण पाणी पुरवठा योजना**

अशी नोंद घेण्यात आली की, सुरु असलेले काम बंद करणे/ काढून घेणे सहजी शक्य होणारे नाही. कामे सुरक्षित स्तरावर आणून घेणे शक्य व्हावे, मात्र त्यासाठी अंदाजे किती निधी आवश्यक आहे याची माहिती संकलीत व्हावी.

....४....

उपलब्ध निधीमध्ये प्राधान्य देवून पूर्ण करावयाच्या कामांची निकड तत्वत: मान्य करण्यात आली. त्यामध्ये गुणवत्तेचे/शुध्द, क्षार विरहित पाणी पुरवठा आवश्यक असलेल्या योजना, ज्या ठिकाणी ७५% किंवा ९०% पेक्षा जास्त काम होवून भांडवली कामे थोड्या फार अधिक निधीने पूर्ण करुन जनतेला पाणी पुरवठा सुरु होईल आणि ज्या गावांना सतत पाणी टंचाईला तोंड देवून दरडोई २० लिटर किंवा त्याहूनही कमी पाणी मिळत आहे, अशा ठिकाणच्या पाणी पुरवठा योजना प्राधान्याने पूर्ण करणे शक्य आहे. अशा प्रकारे किती योजना दि.३१ मार्च, २००१ पर्यंत पूर्ण होतील याची माहिती संकलित केली जावी.

स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायती, नगरपालिका इत्यादींशी समन्वय व संपर्क योजनेची अंमलबजावणी सुरु असतानाच ठेवावा. जेणेकरुन, योजनांची अंमलबजावणी पूर्ण होताच देखभाल दुरुस्तीसाठी त्या हस्तांतरित होतील. एकंदरीत उपलब्ध होणाऱ्या निधीमध्ये नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी वापरणेचा निधी स्वतंत्रपणे ठेवला जाईल व वापरला जाईल यासाठी प्रयत्नही व्हावेत.

अंमलबजावणीत असलेल्या पाणी पुरवठा योजनांना पुरेसा निधी प्राप्त होवू शकत नसल्यामुळे ठेकेदारांनी निवेदने दिली आहेत. त्यासाठी वेगवेगळया कलमाखाली एकमेकाचे उत्तरदायित्व निभाविण्यामध्ये अडचणी उत्पन्न झाल्याची नोंद घेण्यात आली. ठेकेदारांनी प्राधिकरणाचे अध्यक्ष तसेच प्रशासनाबरोबर वेगवेगळया वेळी गेल्या ६ महिन्यात अनेकदा चर्चा केलेली असून, वेगवेगळी निवेदने प्राप्त झालेली आहेत. त्यातील काही ठळक मुद्यांचा उल्लेख या कार्यक्रम बाबीमध्ये केलेला असून त्यांची नोंद घेण्यात आली. त्यावर साधकबाधक विचार करण्यात आला.

निधीच्या अनुपलब्धतेमुळे अंमलबजावणीस विलंब झालेल्या कामांचे ठेकेदारांना मुदतवाढ देणे अपरिहार्य ठरते. त्यामुळे मुख्य अभियंता स्तरावर यासाठी शिफारशी करुन त्या सदस्य सचिव(तांत्रिक) व विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता, यांच्या स्तरावर निर्णयाप्रत याव्यात. निधीच्या अनुपलब्धतेमुळे जी मुदतवाढ दयावयाची आहे त्यासाठी दंड आकारणी करु नये असे ठरविण्यात आले. मात्र हा मुद्दा कायदेशीररित्या अडचणीचा आहे किंवा कसे याची तपासणी करुन सदरची कारवाई व्हावी.

मुदतवाढीशी संलग्न भाववाढीच्या कलमाचा विचार करणे अपरिहार्य असल्याची नोंद घेण्यात आली. मात्र याबाबतची चर्चा पुढील बैठकीत करुन निर्णय घेण्याचे ठरले. या संदर्भात पी.व्ही.सी.पाईप्स्च्या साठयाचा आढावा घेण्यात आला व सदरचे पाईप्स्चा वापर प्रगतीपथावर असून प्राधान्याने पूर्ण करावयाच्या कामांसाठी जास्तीत-जास्त वापरण्याचे धोरण मान्य करण्यात आले.

जमवाजमव उचलीची वसुली लवकरात-लवकर करुन घेणेचेही ठरविण्यात आले. त्यामध्ये कोणतीही सवलत देणे शक्य नसल्याची नोंद घेतली गेली.

**२. नागरी पाणी पुरवठा योजना**

ज्या ठिकाणी वित्तीय संस्थांकडून कर्ज घेण्यात आलेले आहे मात्र पाणी पुरवठा योजनांवर झालेला खर्च कमी आहे अशा पाणी पुरवठा योजनांना प्राधान्याने निधी उपलब्ध

करुन दयावा अशा सूचना मा.मंत्री महोदयांनी दिल्या. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून जे कर्जरोखे उभारण्यात आले आहेत यातील ग्रामीण व नागरी योजनांसाठी किती निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे याबाबत सविस्तर प्रस्ताव तयार करावा अशा सूचना देण्यात आल्या.

**कार्यक्रम बाब क्र.५:- निविदा स्वीकृतीच्या वेळी घेण्यात येणारी अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम परत करणेबाबत.**

काही कंत्राटदारांकडून सादर करण्यात येणारे निविदांचे देकार निविदेच्या अंदाजे किंमतीपेक्षा खूपच कमी दराने सादर करण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्याने त्याचा परिणाम कामाच्या गुणवत्तेवर होवू नये, तसेच सदर करण्यात आलेला देकार बराच कमी दराचा असल्याने काम न परवडल्याने कालांतराने कंत्राटदाराने कामे सोडून देणे, परिणामी योजनेची कामे रखडणे असे प्रकार टाळण्याच्या उद्देशाने जे देकार निविदेतील दरांपेक्षा १०% कमी वा त्यापेक्षा अधिक कमी दराचे आहेत त्या देकारांच्या स्वीकृतीच्या वेळी कंत्राटदारांकडून अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम घेण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला होता. मात्र ही अनामत रक्कम कशा पध्दतीने परत करावी याबाबत निर्देश मिळावेत म्हणून हा प्रस्ताव सादर करण्यात आल्याचे सदस्य सचिवांनी स्पष्ट केले. अतिरिक्त सुरक्षा अनामत रकमेपोटी प्राप्त झालेला निधी हा बँक गॅरेंटी स्वरुपात असल्याने व ही बँक गॅरेंटीच परत करावयाची असल्याने प्राधिकरणावर यासाठी कोणत्याही निधीचे उत्तरदायित्व येणार नाही याची नोंद घेण्यात आली.

या अनुषंगाने कार्यक्रम बाबीत दिलेल्या मुद्यांवर साधकबाधक चर्चा करण्यात येवून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

१. एकूण कामाच्या ५०% पेक्षा कमी काम झाल्यास – अतिरिक्त सुरक्षा अनामत अजिबात परत करु नये.

२. ५०% च्या पुढे जसजसे काम होत जाईल तसतशी कामाच्या प्रमाणात सुरुवातीस घेतलेली अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम परत करण्यात यावी.

३. जी कामे ७५% च्या वर पूर्ण झाली आहेत व निधीच्या अनुपलब्धतेमुळे रेंगाळत सुरु आहेत त्यांचेबाबत संपूर्ण अतिरिक्त सुरक्षा अनामत परत केली जावी.

काम त्याप्रमाणात पूर्ण झाले असल्याचा दाखला तसेच निधीच्या अनुपलब्धतेमुळे ७५% चे पुढे काम रेंगाळले आहे हे किमान अधीक्षक अभियंता स्तरावरील अधिकाऱ्याने प्रमाणित केल्यासच क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत ठेकेदारास परत करावी.

**कार्यक्रम बाब क्र.६:- निविदा पूर्व अर्हता ठरविताना ठेकेदाराच्या कंपनीचे ''निव्वळ आर्थिक मूल्य''(Net worth) विचारात घेण्याबाबतच्या परिपत्रकाचा पुनर्विचार करणे.**

रु.२५ कोटीपेक्षा जास्तीच्या निविदांसाठी आर्थिक दृष्टया सक्षम असणारा कंत्राटदारच अर्हतापात्र ठरावा व कामे नियोजित वेळेत पूर्ण व्हावीत यासाठी कंत्राटदाराचे निव्वळ आर्थिक मूल्य विचारात घेवून कंत्राटदारांना निविदा देकार दयावेत अशा सूचना देण्यात आलेल्या होत्या. कार्यक्रम बाबीमध्ये दिलेल्या वस्तुस्थितीवर साधकबाधक चर्चा झाली. या परिपत्रकाचा विचार करुन स्पर्धात्मक

देकार प्राप्त व्हावेत यासाठी सदर परिपत्रकातील कंत्राटदाराचे निव्वळ आर्थिक मूल्य निविदेतील कामाच्या किमान २५% असावे ही अट शिथिल करावी यासाठी हा प्रस्ताव सादर करण्यात आल्याची नोंद घेण्यात आली.

चर्चेअंती प्रस्ताव मान्य करण्यात आला.

**कार्यक्रम बाब क्र.७:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीने घेतलेल्या निविदा स्वीकृतीच्या व अस्वीकृतीच्या निर्णयांवर शिक्कामोर्तब.**

दि.२०/६/२००० व दि.५/९/२००० रोजी झालेल्या निविदा समितीच्या सभांमध्ये ज्या निविदा स्वीकृत व अस्वीकृत करण्यात आल्या त्यांची माहिती या प्रस्तावाव्दारे सादर करण्यात आली असून, या प्रकरणी निविदा समितीने घेतलेल्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यासाठी हा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

यावर सर्वसाधारणपणे चर्चा करण्यात येवून निविदा समितीने घेतलेल्या निर्णयांस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.८:- निलंगा पाणी पुरवठा योजना स्वीकृत निविदा क्रमांक बी-१/३८ सन १९९२-९३ अंतर्गत कामासाठी भाववाढीची अट शिथील करणे.**

या कार्यक्रम बाबीव्दारे सादर करण्यात आलेला प्रस्ताव प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये पुन्हा सादर करावा अशा सूचना मा.अध्यक्ष महोदयांनी दिल्या.

**कार्यक्रम बाब क्र.९:- अहमदनगर वाढीव पाणी पुरवठा योजना,टप्पा-३,भाग-१, प्रक्रिया पूर्व व प्रक्रिया केलेल्या पाण्याच्या उपसा यंत्रणेच्या कामांना भाववाढ मिळणेबाबत.**

कार्यक्रम बाबीव्दारे सादर करण्यात आलेला प्रस्ताव प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये पुन्हा सादर करावा अशा सूचना मा.अध्यक्ष महोदयांनी दिल्या.

## कार्यक्रम बाब क्र.१०:-हिंगोली पाणी पुरवठा योजनेतील उपांगाची विशेष दुरुस्ती घसारा निधीतून करणेबाबत.

हिंगोली पाणी पुरवठा योजना प्राधिकरणाच्या मालकीची योजना म्हणून जानेवारी,१९८५ मध्ये पूण करण्यांत आली. म्हणजेच ही योजना पूर्ण होवून जवळपास १५ वर्षे झाली आहेत. पंपाचे आयुष्य सर्वसाधारणपणे १५ वर्षाचे असते, त्यामुळे पंपाची/मोटरची, विद्युत उपकरणाची, जलशुध्दीकरण केंद्रातील उपकरणाची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच १५ वर्षाच्या कालावधीनंतर, काही उपांगाची विशेषत: जलवाहिन्या, व्हॉल्व्ह, जलकुंभ, इमारती यांची विशेष दुरुस्ती, जलशुध्दीकरण केंद्रातील रेती बदलणे इत्यादी कामे करणे भाग आहे. सदरची कामे या विषयीच्या निकषांनुसार करण्याची गरज सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी सांगितले. या योजनेवर रु.१०३.९४ लक्ष इतका घसारा

निधी उपलब्ध असून पंपींग मशिनरी, स्थापत्य कामे व बिनतारी संदेश यंत्रणा इ.कामांसाठी लागणारा रु.३१.३१ लक्ष विशेष दुरुस्तीचा खर्च घसारा निधीतून करण्याचे प्रस्तावित असून त्यास मान्यता मिळण्यासाठी हा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

चर्चेअंती खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

**<u>ठराव :</u>**

सदर योजना हिंगोली नगरपरिषदेस हस्तांतरित करुन घेत असल्याची पूर्ण खात्री करुनच हिंगोली पाणी पुरवठा योजनेच्या विविध उपांगाच्या विशेष दुरुस्तीच्या रु.२६,६४,८००/- निव्वळ किंमत व रु.३१,३१,०००/- ढोबळ खर्चाचे काम प्राधिकरणाच्या घसारा निधीतून करण्यांस परवानगी प्रदान करण्यांत येत आहे. सदस्य सचिव,म.जी.प्रा.,यांना घसारा निधीतून कामाच्या प्रगतीनुसार रक्कम काढण्याचे व काम पूर्ण करुन घेण्याचे अधिकार या ठरावान्वये देण्यांत येत आहेत.

**<u>कार्यक्रम बाब क्र.११:-स्थानिक स्वराज्य संस्थांकडे असलेल्या थकबाकीच्या वसुलीबाबत.</u>**

म.जी.प्राधिकरणाची स्थानिक स्वराज्य संस्थांकडे असलेली थकबाकी या कार्यक्रम बाबीव्दारे निदर्शनास आणून देण्यात आली. मार्च,२००१ पर्यंत जर नगरपरिषदांनी त्यांच्याकडे असणारी थकबाकी सत्वर अदा केल्यास विलंब आकारापोटी आकारण्यात आलेले शुल्क माफ करण्याबाबत किंवा त्यामध्ये शिथिलता देण्याबाबत विचार व्हावा यावर साधकबाधक विचार करण्यात आला. यावर असे ठरविण्यात आले की, स्थानिक स्वराज्य संस्थांकडे असणाऱ्या थकबाकीच्या वसुलीबाबत प्राधान्याने प्रयत्न करावेत. स्थानिक स्वराज्य संस्थांना थकबाकीतील मुद्यल प्राधान्याने भरणेस उद्युक्त करावे. मात्र विलंब शुल्कातील शिथिलतेबाबत प्रत्येक प्रकरणी स्वतंत्रपणे प्रस्ताव तयार करुन तो शासनास मान्यतेसाठी सादर करावा. सरसकट विलंब शुल्क माफ करण्याबाबत विचार करण्यात येणार नाही.

**<u>कार्यक्रम बाब क्र.१२:-प्राधिकरणातील विविध पदांवरी नियुक्तीकरिता संगणक हाताळणे/वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत.</u>**

कार्यक्रम बाबीव्दारे सादर करण्यात आलेला प्रस्ताव शासकीय धोरणाप्रमाणे असल्याने मान्य करण्यात आला.

**<u>कार्यक्रम बाब क्र.१३:-म.जी.प्राधिकरणाचा सन १९९८-९९९ चा वार्षिक प्रशासनिक अहवाल व लेखा परिक्षण अहवाल.</u>**

**१. म.जी.प्राधिकरणाचा १९९८-९९ चा वार्षिक प्रशासनिक अहवाल**

या प्रकरणी चर्चा करुन प्राधिकरणाचा सन १९९८-९९ चा वार्षिक प्रशासनिक अहवाल मान्य करण्यात येवून तो विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे ठेवण्यासाठी सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आल्याबाबत निर्णय घेण्यात आला.

२. **म.जी.प्राधिकरणाचा १९९८-९९ चा वार्षिक लेखा परिक्षण अहवाल**

म.जी.प्राधिकरणाचे १९९८-९९९ चे वार्षिक लेखे दि.२/२/२००० रोजी झालेल्या ८७ व्या सभेत स्वीकृत झाले आहेत. महालेखापाल लेखा परिक्षण, मुंबई, यांनी या वार्षिक लेख्यांचे परिक्षण करुन त्यांचे पत्र क्र.रिपोर्अ/एमजेपी/एसएआर/१९९८-९९ १८९,दि.२९/८/२००० अन्वये लेखे प्रमाणित केले आहेत याची नोंद घेण्यात आली.

महालेखापाल-१,मुंबई, यांनी प्रमाणित केलेला लेखा परिक्षण अहवाल अनुपालनासह प्राधिकरणाच्या मंजुरीकरिता सादर केला आहे. प्राधिकरणाच्या मंजुरीनंतर प्रमाणित लेखे व लेखा परिक्षण अहवाल विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहाकडे सादर करण्यात येईल. या प्रकरणी चर्चा होवून खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

<u>ठराव :-</u>

प्राधिकरणाचा सन १९९८-९९ चा वार्षिक लेखा परिक्षण अहवाल व त्यावरील अनुपालनास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सन १९९८-९९ चे वार्षिक लेखे व लेखा परिक्षण अहवाल महाराष्ट्र शासनाच्या विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे सादर होण्याकरिता सदरील अहवाल शासनाकडे पाठविण्यासाठी मंजुरी देण्यात येत आहे.